# मेट्रो ३ : आरे कारशेडमध्ये ८ ॲक्वा मेट्रो दाखल



**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गाच्या आरे येथील कारशेडमध्ये ९ पैकी ८ ॲक्वा मेट्रो दाखल झाल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने समाजमाध्यमांवर दिली आहे. डिसेंबर २०२३ पर्यंत बीकेसी ते कफ परेड या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गाच्या आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्याच्या लोकार्पणाची डेडलाइन पाळण्यासाठी एमएमआरसीएलने लगबग सुरू केली आहे. पहिल्या टप्प्यासाठी ९ मेट्रोंची आवश्यकता आहे. सध्या ८ गाड्या दाखल झाल्या असून, एक गाडी येत्या आठवडाभरात दाखल होणार आहे. आरे ते बीकेसी पहिल्या टप्प्याचे काम वेगाने सुरू आहे. ३३.५ किमी मार्गिकेच्या भुयारीकरणाचे काम पूर्ण झाले असून, स्थानकांचे काम अंतिम टप्प्यात आहे. आंध्र प्रदेश श्रीसिटी येथून पहिल्या टप्प्याच्या रेल्वे दाखल झाल्या आहेत. दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण जून २०२४ रोजी पूर्ण करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्याच्या बांधकामाला तसेच तांत्रिक कामाला वेग दिला आहे. ऑगस्ट २०२२ पासून ते सप्टेंबर २०२३ या वर्षभराच्या काळात ८ ॲक्वा मेट्रो दाखल झाल्या असून, संपूर्ण मार्गिकेदरम्यान ३१ मेट्रो ट्रेनची आवश्यकता आहे. ड्रायव्हरलेस मेट्रो आणि भारतीय बनावटीचे मेट्रो डबे हे या डब्यांचे वैशिष्ट्य आहे.